ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार,
उद्योगधंदे, बँकिंग,
सहकार, इत्यादि
विषयांस वाहिलेलें
एकमेव मराठी
साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूली धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं
प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख १९ ऑगस्ट, १९५३ अंक ११

## विविध माहिती

**भारतांत खनिजांचे दोन नवे कारखाने**—डॉ. भटनागर हे नुकतेच युरोपचा आणि अमेरिकेचा दौरा करून आले असून त्यांनीं बेलिरिअम ऑक्साइड आणि टिटॅनिअम ह्या दोन खनिजांसाठीं दोन कारखाने काढण्याची व्यवस्था परदेशी कंपन्यांशी केली आहे असें समजतें. त्याशिवाय तेलाचे कारखाने काढण्यासंबंधींहि बोलणीं चालू आहेत.

**इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन**—हैद्राबाद राज्यासाठी काढण्यांत येणारी इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ता. १ सप्टेंबर पासून कामास प्रारंभ करणार आहे. कॉर्पोरेशनचें भांडवल १ कोटी रुपयांचें असून त्यांतील निम्में भारतीय सरकारनें व निम्में राज्यसरकारनें दिलेलें आहे. कॉर्पोरेशनचा कारभार सरकारच्या अर्थखात्याच्या देखरेखीखाली चालणार आहे.

**राज्य-सरकारांच्या दिल्लींत इमारती**—भारतीय सरकारनें आसाम, बिहार, ओरिसा आणि जम्मू ह्या राज्यसरकारांना प्रत्येकीं एक एकर जागा राजनैतिक वसाहतीसाठी मुक्रर केलेल्या भागांत दिली आहे. राज्य-सरकारांचे अधिकारी कामानिमित्त दिल्लीस जातील त्यावेळीं त्यांना उतरण्यासाठी म्हणून वरील जागेंत इमारती बांधण्यांत येणार आहेत.

**उर्दू भाषेंत काँग्रेसचा इतिहास**—उर्दू भाषेंत काँग्रेसचा इतिहास लिहिण्याचें काम दिल्लींतील एक प्रसिद्ध कवी शमीम किलहानी ह्यांच्याकडे सोपविण्यांत आल्याचें समजतें. हा इतिहास दोन ओळींच्या कडव्यांत लिहिण्यांत येणार आहे. अशी सुमारें २,००० कडवीं अथवा ‘ शेर ’ होतील असा अंदाज आहे.

**मोगा येथें संस्कृत कॉलेज**—मोगा येथील ब्रह्मवृंदांनीं आपली एक सभा भरवून एक संस्कृत कॉलेज काढण्याचें ठरविलें आहे. हें काम करण्यासाठी ‘ ब्राह्मण मंडळ ’ नांवाची एक संघटना काढण्यांत आली असून ती लोकांच्याकडून कॉलेजसाठी पैसे गोळा करण्याचें कार्य करणार आहे.

**औद्योगिक हिरे**—औद्योगिक हिऱ्यांच्या निर्यातीवरील नियंत्रणें अमेरिकेनें आतां रद्द केलीं आहेत. बऱ्याच वर्षांनंतर हीं नियंत्रणें रद्द करण्यांत आलीं असल्यामुळें आतां त्यांची निर्यात मोकळेपणानें करण्यांत येईल. ह्या हिऱ्यांचा उपयोग कारखान्यांतील कापणीकाम करणाऱ्या यंत्रांत करण्यांत येतो.

**मुंबईमध्यें जपानी बँक**—बँक ऑफ टोकिओची एक शाखा मुंबई येथें काढण्यांत येणार असल्याचें समजतें. युद्धानंतर मुंबईत काढण्यांत आलेली ही पहिलींच जपानी बँक आहे. मुंबई बंदरांत जपानकडून येणारा माल भारतामधील इतर कोठल्याहि बंदरांपेक्षा अधिक असतो. कलकत्ता बंदरांतून सर्वांत अधिक माल जपानला पाठविण्यांत येतो.

**अलिगड येथील कुलपांचा कारखाना**—अलिगड येथील कुलुपांच्या ग्रामोद्योगाच्या कारखान्यांत जुलै महिन्यांत निरनिराळ्या आकाराचीं ३,४४४ कुलपें तयार करण्यांत आलीं आणि त्यांच्यावर दर्जाचे शिक्के मारण्यांत आले. सर्व कुलपांची किंमत सुमारें १०॥ हजार रुपये झाली. ३० जून, १९५३ रोजीं संपलेल्या तिमाहींत २३,२६५ रुपये किंमतीचीं ६,९५० कुलपें बनविण्यांत आलीं.

**कांद्यांच्या आयातीला बंदी**—सीलोन द. भारतामधून तांबड्या कांद्यांची आयात करित असे. पण चालू वर्षी आतांपर्यंत खुद्द सीलोनमध्येंच कांद्यांचें भरपूर पीक आल्यामुळें भारतामधून कांदे आयात करण्यास बंदी करण्यांत आली आहे.

**मच्छीमारीवर कायद्यानें नियंत्रण**—मद्रास सरकार मच्छीमारीच्या धंद्याबद्दल एक कायदा करून घेणार आहे. माशांना मारणें, पकडणें आणि त्यांची विक्री करणें, इत्यादींवर कायदा नियंत्रण घालणार आहे. इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल् रिसर्चनें सुचविलेल्या शिफारशींना धरून कायदा तयार करण्यांत येणार आहे.

**“ व्यापार ”** येत्या पाडव्यापासून ( ता. ७ नोव्हेंबर ) श्री. अ. हि. शाह व श्री. रमेश मंत्री हे “ व्यापार ” नांवाचें मराठी साप्ताहिक कोल्हापूर येथें प्रसिद्ध करणार आहेत. भारतांतील व्यापार व उद्योग यांची वाढ कशी करतां येईल याची चर्चा व व्यापारी महत्त्वाच्या वार्ता या साप्ताहिकांत देण्यांत येतील. विशेषतः महाराष्ट्र, गुजराथ, सौराष्ट्र, कच्छ व कर्नाटक या भागांतील व्यापारविषयक घडामोडींना या साप्ताहिकांत प्राधान्य देण्यांत येईल. साप्ताहिकाची वार्षिक वर्गणी ४ रु. आहे.

**सिनेमागृहांत टेलिव्हिजनचा पडदा**—ब्रिटनमधील सिनेमागृहांतून टेलिव्हिजनचा पडदा बसविण्यासाठीं १,७५,००,००० पौंड खर्च करण्यांत येणार आहेत. ब्रिटनमधील ४,५०० सिनेमागृहांतून टेलिव्हिजनचे कार्यक्रम दाखवितां यावे म्हणून ही व्यवस्था करण्यांत येत आहे. कांहीं कार्यक्रम प्रसंग घडत असतांच दाखवण्यांत येतील, आणि कांहींचें टेलिव्हिजनसाठी चित्रीकरण करण्यांत येईल.

**ओरिसांत पेट्रोल सांपडलें**—ओरिसामधील खाणींच्या भागांत पेट्रोलचा सांठा आढळून आल्याचें समजतें. भारतीय सरकारच्या भूगर्भशास्त्रज्ञांनीं ह्या भूप्रदेशाची तपासणी करून एक अहवालहि सादर केला आहे. भारतीय सरकार अहवालाचा विचार करीत असलें तरी तेलाच्या शोधाची ही अगदीं प्राथमिक अवस्था असल्याचें समजतें.

## सेंट्रल म्युच्युअल लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.

### सावधगिरीचें व काटकसरीचें फलदायी धोरण

वरील कंपनीचा १९५२ सालअखेरचा वार्षिक अहवाल व जमाखर्चाचे तक्ते आमचेकडे परीक्षणार्थ आले आहेत. अहवालाच्या वर्षी, कंपनीकडे एकूण रु. ६,८५,५०० चे विमाअर्ज आले त्यांतील रु. ५,७५,००० चें काम पूर्ण झालें. मागच्या वर्षापेक्षा हा आंकडा थोडासा अधिकच आहे, ही गोष्ट उल्लेखनीय आहे. कारण, व्यापारांतील मंदीची लाट झपाट्यानें पुढें सरकत आहे व विमाकंपन्यांचा मुख्य आधार जो मध्यमवर्ग त्यालाच मंदीचा तडाखा प्रथम व तीव्र बसत असतो हें सत्य आहे. कंपनीचें वर्षाचें उत्पन्न रु. १,७६,४२५ असून खर्च अवघा रु. ३८,५९८ इतका आहे. रिन्यूअल खर्चाचें प्रमाण फक्त १३·८ इतकें म्हणजे गेल्या वर्षापेक्षाहि कमी आहे. विमाकायद्यानें खर्चाची जी कमाल मर्यादा घालून दिलेली आहे, त्या मर्यादेच्या आंतच खर्चाचें प्रमाण प्रथमपासून ठेवून पुढील मूल्यमापनांत स्पष्ट होणाऱ्या यशाचा कंपनीनें पायाच घालून ठेवला आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. १९५२ सालअखेर कंपनीचें दुसरें मूल्यमापन होणार असून, त्याची सर्व प्राथमिक तयारी पूर्ण झालेली आहे. मूल्यमापनाचा निकाल सप्टेंबर अखेरीस हातीं येईल असा अंदाज आहे. कंपनीच्या एकूण रु. ७,६३,४२३ जिंदगीपैकी चार लाखांचे वर रकम सरकारी व सरकारमान्य अशा रोख्यांत गुंतविलेली आहे. स्थावर मिळकतींवर व पॉलिसींवर दिलेल्या कर्जाचा आंकडा रु. ८६ हजारावर आहे. कंपनीच्या पुणें येथील जागेंत जवळ जवळ १,८४,००० रुपये गुंतलेले आहेत. कंपनीस मिळालेलें सरासरी व्याज साडेचार टक्क्यांच्या आसपास आहे. व्याजाचा हा समाधानकारक दर व खर्चाच्या बाबतींत प्रथमपासून दाखविला जाणारा संयम व काटेकोरपणा या गोष्टी लक्षांत घेतां संचालक मंडळास, मूल्यमापनाच्या निकालाबाबत वाटणारा आशावाद प्रत्यक्ष अनुभवास येईल, असें स्पष्ट दिसतें व पहिल्या मूल्यमापनापेक्षा जास्त बोनस देणें कंपनीस सहजच शक्य होईल, असें वाटतें.

कंपनीच्या मालकीच्या येरवडा येथील हवेशीर जागेंत प्लॉटस् पाडण्यांत आले असून, आतां तेथें रस्ते, पाणी, वीज वगैरे सर्व सोई उपलब्ध झाल्या आहेत. हिंदुस्थान सरकारचे अर्थमंत्रि ना. चिंतामणराव देशमुख यांचा 'योजना' बंगला याच कॉलनींत आहे, ही गोष्ट डायरेक्टरांनीं आपल्या अहवालांत अभिमानपूर्वक नमूद केली आहे. अर्थ-मंत्र्यांच्या शेजाराचा लाभ घेण्यासाठी बरेच लोक येतील व कंपनीची कॉलनीची योजना पूर्णपणें यशस्वी होईल अशी अपेक्षा आहे. प्लॉटसूची विक्री आतां झपाट्यानें होत असून ग्राहकांना वाजवी दरांत चांगले प्लॉट मिळून शिवाय कंपनीलाहि ह्या व्यवहारांत चांगला नफा मिळणार आहे.

कंपनीचे उत्साही मॅनेजिंग डायरेक्टर श्री. शंकरराव आगाशे यांनाच कंपनीच्या भरभराटीचें श्रेय देणें उचित ठरेल. अर्थात् पुण्याचे प्रसिद्ध इंजिनियर श्री. रामभाऊ साठे, नागपुरांतील 'महाराष्ट्र'चे श्री. नानासाहेब ओगले, यवतमाळचे, श्री. दादासाहेब कोल्हे, वगैरे निरनिराळ्या व्यापारी क्षेत्रांतील मंडळी कंपनीच्या संचालक मंडळांत राहून आपल्या अनुभवाचा फायदा कंपनीस सतत देत आहेतच. कंपनीस आम्हीं असेंच अधिकाधिक यश इच्छितों.


# दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,१०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—यथावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील सांगली चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, B. Com., C. A. I. B. मॅनेजर



# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

स्थापना १९११

टेलिफोन नं. २५४६१, ३१,६८६ | पोस्ट बॉक्स नं. ४७२, तारेचा पत्ता : फार्मरबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगांसाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३३,२५,४०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. २६,००,००० |
| | रु. ५९,२५,४०० |
| गंगाजळी व फंड | रु. ४३,२८,९०० |
| ठेवी | रु. ८,५४,८१,४०० |
| खेळतें भांडवल | रु. १०,८५,०२,२०० |

१५ जिल्ह्यांत ६३ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. १९ ऑगस्ट, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## म्युच्युअल विमा कंपन्या आणि इन्कमटॅक्स

असोसिएशन ऑफ म्युच्युअल लाइफ ऑफिसेस इन इंडियाची वार्षिक साधारण सभा मुंबई येथें नुकतीच भरली होती, त्यावेळीं तिचे अध्यक्ष श्री. टी. आर. ए. पै ह्यांनीं म्युच्युअल विमा कंपन्यांना सहकारी विमा सोसायट्यांप्रमाणेंच इन्कमटॅक्सची माफी असावी, अशी मागणी केली. सरकारनें अशी माफी देण्याचें नाकारलें होतें. भागीदारांच्या विमा कंपन्या आणि म्युच्युअल विमा कंपन्या ह्यांतील मूलभूत फरक, आणि भागीदारांच्या विमा कंपन्या आणि सहकारी विमा सोसायट्या ह्यांतील मूलभूत फरक, हे सारखेच आहेत. म्हणून, सहकारी सोसायट्यांप्रमाणें म्युच्युअल कंपन्यांनाहि इन्कमटॅक्सची माफी मिळाली पाहिजे. सहकारी संस्थेंत सभासद एकमेकांशींच व्यवहार करतात, म्हणून तिला इन्कमटॅक्स नाहीं; म्युच्युअल कंपन्यांतहि विमेदारांच्याच हातांत सर्व कांहीं असतें; नफा मिळविण्याचे उद्देश असलेले भागीदार त्यांत नसतात. १९३९ पर्यंत म्युच्युअल कंपन्यांवर इन्कमटॅक्स आकारला जात नसे; ग्रेटब्रिटनमधील कायद्याचें तें अनुकरण होतें. पुढें म्युच्युअल कंपन्यांवर इन्कमटॅक्स लादण्याचा पार्लमेंटनें प्रयत्न केला, त्यास हाउस ऑफ लॉर्डसच्या निवाड्यानें पायबंद घातला. "म्युच्युअल कंपन्यांना वाढावा उरला, तर त्यास 'नफा' म्हणतां येणार नाहीं; विमेदारांचाच तो पैसा असून त्यावर सर्वस्वी त्यांचाच हक्क पोंचतो" अशा अर्थाचा तो निवाडा आहे. हिंदी सरकारनेंहि १९३९ मध्यें म्युच्युअल कंपन्या व सहकारी विमा कंपन्या ह्यांना इन्कमटॅक्स कायद्याखालीं आणण्यासाठीं दुरुस्ती केली, परंतु मुंबई हायकोर्टाच्या एका निवाड्यामुळें सहकारी विमा सोसायट्या इन्कमटॅक्सच्या कचाट्यांतून सुटल्या. दुसऱ्या एका प्रकरणांत मुंबई हायकोर्टानें म्हटलें आहे, "म्युच्युअल कंपन्यांवर कर बसविण्याचा सरकारचा प्रयत्न स्तुत्य समजला जाणार नाहीं." तथापि, कायदा कायम राहिला असून म्युच्युअल कंपन्यांना इन्कमटॅक्स द्यावा लागत आहे. टॅक्सेशन इन्क्वायरी कमिटीकडे असोसिएशननें आपलें निवेदन आतां पाठविलें आहे.

हप्त्यांची रक्कम किंवा नफ्यासहित पॉलिसींसाठी बोनसाची तरतूद (लोडिंग) ह्यावरून विम्याच्या खर्चाचा हिशेब काढतां येणार नाहीं. त्याला फक्त "अंदाज अधिक थोडक्या-फार चुकांसाठी ठेवलेली कूस" एवढेंच म्हणतां येईल. प्रत्यक्ष अनुभवानंतर, जरूरीपेक्षा ज्यास्त वसूल झालेल्या हप्त्यांची परतफेड म्हणजेच म्युच्युअल कंपन्यांचा बोनस होय; तो नफा नसून त्यावर कर घेणें चुकीचें आहे. म्युच्युअल कंपन्यांची घटना व वैशिष्ट्य ह्यांचा विचार केला, म्हणजे बोनस जाहीर करण्यासाठी त्या जादा हप्त्यांची रक्कम जमा करीत नसतात, हें स्पष्ट होईल. ह्या उलट, भागीदारांच्या मालकीच्या कंपन्या गिऱ्हाईक आकर्षण्यासाठी व त्यांतून नफा वाढविण्यासाठी बोनस जाहीर करण्याच्या मार्गे असतात. इंग्लिश व अमेरिकन कायद्यांनीं म्युच्युअल कंपन्यांचें हें वैशिष्ट्य मान्य केलें असून, त्यांनीं ह्या संस्थांवर इन्कमटॅक्स लादलेला नाहीं. हिंदी म्युच्युअल कंपन्यांची मागणी इतकी साधी असतांना सरकारनें तिच्याकडे कानाडोळा करणें, म्हणजे मिळत असलेला कराचा पैसा बुडूं नये ह्यासाठी तत्त्वांकडे केवळ स्वार्थीपणानें दुर्लक्ष करणें होय.

---

## टाटा आयर्न अँड स्टील कं. लि

वरील कंपनीस ३१ मार्च, १९५३ अखेरच्या वर्षीं २,१०,५४,९०६ रु. नफा झाला. भागीदारांना मागलि वर्षाप्रमाणेंच डिव्हिडंड मिळणार आहे. फर्स्ट प्रेफरन्स (१०० रु.) ला ९ रु., सेकंड प्रेफरन्स (१०० रु.) ला ७ रु. ८ आ., ऑर्डिनरी (७५ रु.) ला २१ रु. व डिफर्ड (३० रु.) ला ११५ रु. ३ आ. असें डिव्हिडंड दिलें जाईल. कंपनीचे सर्वच डिफर्ड शेअर्स ३० रु. चे नाहींत; एकूण ४८,७५० डिफर्ड शेअर्सपैकी २६,२५० डिफर्ड शेअर्स १९१७ मध्यें प्रत्येक शेअरला ३७० रु. वाढावा घेऊन कंपनीनें विकलेले आहेत. सुमारें ८० कोटी खेळत्या भांडवलाच्या व २ कोटींवर नफा मिळविणाऱ्या कंपनीच्या मॅनेजिंग एजन्सी फर्मला ४४½ लक्ष रु. कमिशन मिळावयाचें होतें, त्यापैकी तिनें ५ लक्ष रु. कामगारांच्या शिक्षणविषयक सोईसाठी सोडून दिले आहेत. डायरेक्टरांची फी फक्त १६,२०० रु. आहे. जमशेदपूर येथील व खाणींचे त्रैमासिक हिशेब तपासण्यासाठी ऑडिटरांना ६०,००० रु. दिले व मुंबई येथें मुख्य कचेरींत कायद्यानें आवश्यक तें ऑडिट करण्यासाठी त्यांना १०,००० रु. दिले. जमशेदपूर येथील प्रत्येक नोकरास वार्षिक सरासरी वेतन २,२०६ रु. मिळालें. एकूण उत्पन्नापैकी २९.५४% उत्पन्न कामगारांना मिळालें, २३.८६% कच्च्या मालाच्या खरेदीसाठीं लागलें, १५.९४% वहातुकीवर खर्च झालें, ११.०८% दुरुस्ती वगैरेवर खर्च झालें, ८.७९% सरकारला दिलें, ५.०७% व्यवस्थेसाठी लागलें, ४.४९% डिव्हिडंडच्या रूपानें भागीदारांना मिळालें व १.२३% रिझर्व्हमध्यें गेलें.

कंपनीच्या भागांची वर्गवारी, धारण करणारांप्रमाणें, खाली दिली आहे:—

| | भागीदारांची संख्या | शेअर्सची दर्शनी किंमत | शेअर्सच्या एकूण दर्शनी किंमतीशीं प्रमाण |
|---|---|---|---|
| | | रु. | % |
| व्यक्ती | २८,८७६ | ६,४१,०३,३५५ | ६१.२९ |
| बँका | ५३ | ९६,९७,४९० | ९.२७ |
| विमा, औद्योगिक, इ. कंपन्या | १३६ | १,८७,७३,२६५ | १७.९५ |
| इतर | २८० | १,२०,२०,२९० | ११.४९ |
| एकूण | २९,३४५ | १०,४५,९४,४०० | १००.०० |

## भारतांतील चित्रपटांचा व्यवसाय

भारताच्या पंचवार्षिक कार्यक्रमांत चित्रपटांचा उपयोग करून आरोग्यविषयक आणि सामाजिक शिक्षण देण्यांत यावें अशी सूचना करण्यांत आली असून त्या दृष्टीनें कांहीं मार्गदर्शनहि केलें आहे. भारत सरकारच्या माहिती आणि नभोवाणी खात्यातर्फे वार्तापट काढण्यांत येत असले तरी हा व्यवसाय मुख्यतः करमणुकीच्या क्षेत्रांतच मोडतो. भारतांत ३,५०० सिनेमागृहें असून त्यांतून दररोज सुमारें २५ लाख लोकांचें मनोरंजन करण्यांत येत असतें. व्यवसायांत सुमारें ४० कोटी रुपयांच्यावर भांडवल गुंतलेलें आहे आणि ह्याच्या निरनिराळ्या शाखांत मिळून १ लाखापेक्षा अधिक लोक काम करीत असतात. धंद्याचें एकूण उत्पन्न दरवर्षी २५ कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. सरकार आणि म्युनिसिपालिटया ह्यांना कराच्या रूपानें १२ कोटी रुपये प्राप्ति ह्या व्यवसायापासून होते. अर्थात् प्राप्तीवरील कर आणि सुपरटॅक्स ह्यांच्या पायीं भरावी लागणारी रक्कम वेगळीच.

चित्रपटांच्या उत्पादनाच्या दृष्टीनें भारताचा अनुक्रम अमेरिकेच्या खालोखाल म्हणजे दुसरा लागतो. परंतु सिनेमागृहांच्या संख्येच्या दृष्टीनें भारताचा अनुक्रम जगांत आठवा लागतो आणि लोकसंख्येच्या सिनेमागृहांशीं असणाऱ्या प्रमाणाच्या बाबतींत तर तो खूपच खालीं लागतो. खालील तक्तांत भारताचें स्थान दाखविणारे कांहीं आंकडे दिले आहेत.

| देश | लोकसंख्या (कोटी) | सरासरी वार्षिक चित्रपट-निर्मिति | सिनेमा-गृहें. |
|---|---|---|---|
| अमेरिका | १५·१ | ४५० | २०,२३० |
| भारत | ३४·६ | २५० | ३,५०० |
| जपान | ८·२ | १८० | ३,७०० |
| इटली | ४·६ | १२० | ७,५०० |
| फ्रान्स | ४·१ | ११० | ५,२०० |
| जर्मनी | ६·९ | ८९ | ५,८३२ |
| ब्रिटन | ५·० | ८७ | ४,७७५ |
| स्पेन | २·८ | ४० | ३,५८३ |
| रशिआ | १९·३ | १२ | ४६,७९० |

(प्रोजेक्टर्स)

भारतांत तयार होणाऱ्या हिंदी चित्रपटांना बाजारपेठ अधिक मोठी मिळते. बहुतेक हिंदी बोलपट मुंबई राज्यांत तयार होतात. प्रादेशिक भाषांतून तयार होणाऱ्या चित्रपटांची संख्या युद्धोत्तर कालांत बरीच वाढली आहे. मुंबई खेरीज चित्रपटांची निर्मिति कलकत्ता आणि दक्षिण भारतांत होते. हिंदी आणि इतर प्रादेशिक भाषांतील चित्रपटांच्या निर्मितीचा तक्ता शेवटीं दिला आहे. भारतांत चित्रपट घेण्याचे ७० स्टुडिओज आहेत. त्यांची स्थानिक वर्गवारी अशी: मुंबई राज्य एकूण ३० स्टुडिओज; पैकी मुंबईत २६, पुण्यांत ३, आणि कोल्हापूरला १; दक्षिण भारतांत एकूण २२ स्टुडिओज आहेत. त्यांची स्थानिक वर्गवारी पुढीलप्रमाणें: मद्रास १४, सालेम २, कोइमतूर २, मदुरा १, अलेप्पी १, त्रिवेंद्रम १, म्हैसूर १; बंगालमध्यें १४ स्टुडिओज असून ते सर्व कलकत्ता शहरांतच आहेत. ह्यापैकी सर्वच स्टुडिओज सध्यां चालू आहेत असें नाहीं. हल्लीं सुमारें ६० स्टुडिओमध्यें चित्रपट घेण्याचें काम चालू आहे. १९४९ मध्यें भारतांतील चित्रपटांच्या निर्मितीनें उच्चांक गांठला. त्यासालीं २८९ चित्रपट तयार झाले. पण त्यानंतर मात्र अनेक कारणांमुळें चित्रपट-निर्मिति कमी झालेली आहे. ह्या धंद्याविषयीं १९४९–५१ मध्यें तयार करण्यांत आलेल्या पाटील-चौकशी कमिटीच्या अहवालांत तपशीलवार माहिती मिळू शकते.

## साखरेची किंमत कां वाढली?

एप्रिल, १९५३ च्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत साखरेच्या किंमती स्थिर होत्या, त्या पुढें मणास २ ते ४ रु. पर्यंत वाढल्या. साखरेची वहातूक लवकर करून, २७ रु. मण दरानें रिझर्व्ह स्टॉकमधील साखर उपलब्ध करून देऊन आणि साखर आयात करण्याचा निर्णय जाहीर करून, सरकारनें साखरेची किंमत उतरविण्याचा प्रयत्न केला व १ ते २ रु. एवढ्यानें किंमत उतरलीहि. साखरेचा पुरवठा मागणीपेक्षा कमी पडेल, अशी व्यापाऱ्यांची कल्पना झाल्यामुळें व विक्रीकेंद्रांत साखर पोंचविण्यास वॅगन्सचा तुटवडा भासल्यामुळें साखरेची किंमत अपेक्षेप्रमाणें मात्र उतरली नाहीं. खरी परिस्थिति अशी आहे, कीं १९५१–५२ चे मानानें १९५२–५३ मध्यें साखरेचें उत्पादन घटलें आहे. उसाची निर्मिति ५% कमी झाली, गुळास अधिक बरी किंमत आल्यानें कारखान्यांना मिळावयाचा कांहीं ऊंस गुळाच्या गुऱ्हाळांकडे गेला, चालू कारखान्यांची संख्या १४१ वरून १३४ वर आली आणि ऊंस गाळण्यास २ आठवडे उशीर झाला. गेल्या तीन वर्षांतील उत्पादनाचे तुलनात्मक आकडे खाली दिले आहेत:—

| वर्ष | उत्पादन (लक्ष टन) | निर्गत (टन) |
|---|---|---|
| १९५०–५१ | ११·१६ | झाली नाहीं |
| १९५१–५२ | १४·९७ | १०,७५५ |
| १९५२–५३ | १२·९३ | ६,४३२ |

साखरेचे घाऊक व किरकोळ भाव खालीलप्रमाणें होते:—

| | कलकत्ता | | कानपूर | | मुंबई | |
|---|---|---|---|---|---|---|
| तारीख | घाऊक | किरकोळ | घाऊक | किरकोळ | घाऊक | किरकोळ |
| ६·१२·५२ | २९–६ | ०–१३ | २७–१० | ०–११¼ | ३३–० | ०–१४ |
| २५·७·५३ | ३१·१४ | ०–१३¼ | ३१–० | ०–१२¾ | ३२·१२ | ०–१३¾ |

## सरकारी दिरंगाईचें एक उदाहरण

मद्रासमधील एका गांवाजवळ पाण्याचें तळें आहे, त्यांतून जवळच्या चार खेडेगांवांना शेतीसाठी पाणीपुरवठा होतो. त्यापैकी एका खेडेगांवच्या शेतकऱ्यांनीं १९४७ मध्यें सरकारकडे अर्ज केला. त्यांच्या २०० एकरांना पाणी मिळावें म्हणून धरणांतून वेगळा दरवाजा काढून देण्यांत यावा व पाट खणण्यांत यावा अशी त्यांची मागणी होती. ह्यास येणाऱ्या खर्चापैकी एक चतुर्थांश रक्कम २० वार्षिक हप्त्यांत देण्याचें त्यांनीं मान्य केलें. दोन वर्षांनीं कलेक्टर कचेरींतील हेडक्लार्कनें अर्जावर, ११ ऑक्टोबर, १९४९ रोजीं शेरा मारला, "अर्जदारांना उत्तर देण्यांत यावें कीं त्यांच्या अर्जाचा विचार चालू आहे आणि सरकारी निर्णय योग्य वेळीं त्यांना कळविण्यांत येईल." सुपरिंटेंडिंग इंजिनिअरनीं २१ मार्च, १९५० रोजीं लिहिलें, "स्वतंत्र दरवाजा–पाट ह्यांच्याविषयीं विचार चालूं आहे." एक वर्षाच्या नंतर त्यांनीं २ मे, १९५१ रोजीं पुनः लिहिलें "ह्यासंबंधांत शिफारसी चीफ इंजिनिअरकडे मंजुरीसाठी धाडण्यांत आल्या आहेत." एक्झिक्युटिव्ह इंजिनिअरनें १४ सप्टेंबर, १९५१ रोजीं लिहिलें, "कलेक्टरबरोबर पत्रव्यवहार चालू आहे. तपशीलवार नकाशे व खर्चाचे अंदाज तयार करण्यांत आले आहेत. त्यावर कलेक्टरांचे शेरे आल्यावर पुढील तजवीज होईल." २६ फेब्रुवारी, १९५३ रोजीं एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर पुनः जागे झाले, "सुपरिंटेंडिंग इंजिनिअरबरोबर आणि चीफ इंजिनिअरबरोबर पत्रव्यवहार सुरू आहे. हुकूम लवकरच हातीं येईल." बिचारे शेतकरी अजून पाटाच्या पाण्याची वाट पहात आहेत!

आकडे दाखवितात, त्यापेक्षा प्रत्यक्ष हलाखी जास्त आहे


रिझर्व्ह बँकेच्या संबंधित खात्यांनीं गेल्या दोन वर्षांतील किंमतीमधील चढउतारांचे आकडे एकत्रित करून बँकेच्या बुलेटिनमध्यें प्रसिद्ध केले आहेत. कोरियन युद्धापूर्वीच्या मानानें भारतांत किंमती वाढल्या, त्या अमेरिकेच्या तुलनेनें जास्त जास्त नव्हत्या व ग्रेटब्रिटनमधील वाढ भारतांतील वाढीपेक्षा पुष्कळच अधिक होती असा निष्कर्ष काढण्यांत आला आहे. अमेरिका व ब्रिटिश सरकारांच्यापेक्षा भारत सरकार किंमतवाढ आवाक्यांत ठेवण्यामध्यें जास्त यशस्वी झालें आहे, असा त्यांतून अर्थ निघतो. भारत, ग्रेट ब्रिटन व युनायटेड स्टेटस् ह्यांतील कामगारांच्या रहाणीच्या खर्चाच्या मानाचे तुलनात्मक आकडे भारत सरकारनें प्रसिद्ध केले आहेत, त्यांवरूनहि असाच समज होण्याचा संभव आहे. १९४८ ते १९५२ ह्या मुदतींत ब्रिटिश राष्ट्रीय उत्पन्न ३०% वाढलें, ह्यावरून तेथील लोकांच्या प्रत्यक्ष रहाणीवर प्रतिकूल परिणाम झालेला नाहीं हें लक्षांत येईल. अमेरिकेंत तर उत्पन्न ३०% वाढलें परंतु रहाणीचा खर्च १०% वाढून लोकांच्या रहाणींत सुधारणाच झाली. अधिकाधिक लोकांना काम मिळालें; दोन्हीं देशांत त्याचा निर्देशांक ७% नें वाढला. १९४८ च्या मानानें १९५२ मध्यें भारतांत एम्प्लॉयमेंट एक्सचेंजमार्फत नोकरी व रोजगार मिळवूं पहाणारांची संख्या दुप्पट होऊन, प्रत्यक्ष काम मिळणारांची संख्या कमी झाली आहे आणि राहणीचा खर्च चौपट झाला आहे त्यामानानें वेतनांत वाढ झालेली नाहीं. १९३९ चे मानानें १९४९ मध्यें औद्योगिक कामगारांची स्थिति जास्त मजुरी मिळूनहि अधिकच वाईट होती, असें प्रत्यक्ष सरकारी अहवालांतच नमूद आहे. कोरियन युद्धानंतरच्या काळांतील महागाईनें त्यामुळें जास्तच कहर झाला असल्यास नवल नाहीं, आणि गेल्या कांहीं आठवड्यांतील वाढती महागाई व वाढती बेकारी ह्या मोठ्याच चिंतनीय बाबी झाल्या आहेत.

भारतामधील सोन्याचें उत्पादन

भारतामधील सोन्याच्या खाणी तोट्यांत चालत असल्या तरी दोन वर्षांपूर्वीच्या मानानें सोन्याच्या उत्पादनांत २० टक्के वाढ झाली असून एकंदरीनें उत्पादन वाढत आहे, असें समजतें. १९५०–५१ सालीं ५,४५,४३० तोळे सोन्याचें उत्पादन झालें. १९५१–५२ सालीं ६,२६,९०५ तोळे सोन्याचें उत्पादन झालें. गेल्या वर्षी एकूण ६,५५,७०३ तोळे सोनें निर्माण करण्यांत आलें. त्या पूर्वीच्या दोन वर्षांतील उत्पादनापेक्षा हें उत्पादन २० टक्क्यांनीं अधिक आहे. भारतांत सोनें उत्पन्न करण्याचा दर तोळ्यामागें सरासरी खर्च ११४·८५ रुपये येतो असा अंदाज करण्यांत आला आहे. सध्यां सोनें–बाजारांत सोन्याची किंमत मात्र ९० रुपयांपेक्षा अधिक नाहीं. तथापि, ह्या परिस्थितीनें नाउमेद न होतां खाणींचे मालक सोन्याचें उत्पादन वाढवीत आहेत. त्यांची अशी कल्पना आहे कीं, अधिक उत्पादन केल्यानें उत्पादनाच्या खर्चांत बचत होईल. कदाचित् बाजारांतील परिस्थिति सुधारेल असाहि त्यांचा कयास असावा. सोन्याच्या शोधार्थ भारतांत गेल्या कांहीं वर्षांत भू-गर्भीय तपासणी करण्यांत आली होती. मद्रास राज्याच्या चितूर जिल्ह्यांत व प. बंगालमधील बंकुरा जिल्ह्यांत कांहीं ठिकाणीं सोन्याच्या मातीचे दगड काळ्या रेतीच्या थरांत सांपडले होते. त्याप्रमाणें सौराष्ट्रांतील गोहिलवाड जिल्ह्यांत धाकडा येथें सोन्याची माती नुकतीच सांपडली आहे. ह्या मातीचें सध्यां पृथःकरण करण्यांत येत आहे.


SAVE to help yourself and the NATION

WITH THE

HOME  SAFE

THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum


महाराष्ट्र डिव्हिजनल अर्बन को. बँक परिषद्

वरील परिषदेचें पहिलें अधिवेशन सांगली येथें २० व २१ ऑगस्ट रोजीं श्री. चिन्मुळगुंद, रजिस्ट्रार, को. सोसायटीज, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं होणार आहे. डॉ. जिवराज मेहता ह्यांच्या भाषणानें परिषदेचें उद्घाटन होईल. अर्बन को. बँकेच्या "सहकार मंदिरांत" अधिवेशन भरेल. स्वागत समितीचे चेअरमन श्री. म. ह. गोडबोले, बी. ए., एलएल. बी., एम्. एल्. सी., हे आहेत.

"न्यू सिटिझन बँक हाऊस"चा उद्घाटन समारंभ



(१) श्री. कुंटे (२) श्री. देशपांडे

दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि. च्या नव्या भव्य इमारतीचा उद्घाटनसमारंभ दि. १ ऑगस्ट रोजीं मुंबई विधानसभेचे अध्यक्ष श्री. कुंटे ह्यांच्या हस्तें झाला. समारंभाचे प्रारंभीं, बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. भाऊसाहेब देशपांडे हे श्री. कुंटे ह्यांचें स्वागत करून त्यांना आसनाकडे नेत आहेत.

## कल्याणकारी राज्यनिर्मितीची एक दिशा

### आरोग्य विमायोजनेची प्रगति

भारताची आरोग्य विमायोजना सुरू होऊन झालेल्या १॥ वर्षांच्या काळावधींत स्पृहणीय प्रगति दिसून आली आहे. सध्यां ही योजना दिल्ली, कानपूर व उत्तर प्रदेशांतील सात औद्योगिक शहरांत चालू असून, तिच्या कक्षेत १,५०,००० कामगार व १,२०० मालक येतात. वर्गणीच्या रूपानें, १ कोटी ७४ लक्षाहून अधिक रुपये मालकांकडून व ३९ लक्ष रुपये कामगारांकडून गोळा झाले आहेत. सदरहू योजना चालू होण्यापूर्वीच्या मुदतींत मध्यवर्ती सरकारकडून कर्जाऊ घेतलेल्या ३९ लक्ष रुपयांची परतफेड करण्यांत आली. यावरून या कार्पोरेशनच्या आर्थिक स्थैर्याची कल्पना येते. वर्गणीपैकी सुमारें ८२ लक्ष रुपये सरकारी रोखे आणि नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें यांत गुंतविण्यांत आले आहेत.

### भत्त्याच्या रकमेंत वाढ

भारताच्या इतर प्रदेशांत ही योजना सुरू झाली नसली तरी देशांतील निरनिराळ्या ठिकाणच्या सुमारें १२,००० मालकांकडून वर्गणी गोळा करण्यांत आली आहे. या मालकांच्या कक्षेत सुमारें २० लाख कामगार आहेत. या योजनेंतील प्रचंड स्वरूपाच्या आर्थिक, संघटनात्मक आणि निवासाविषयक प्रश्नांमुळें देशांत सर्वत्र एकाच वेळीं ती सुरू करणें अशक्य झालें. तथापि मर्यादित स्वरूपांत आरोग्य विमा योजनेच्या कक्षेत पुढील दोन वर्षांत २० लक्ष औद्योगिक कामगार येतील. दवाखान्यांतील रोग्यांच्या वाढत्या दैनिक उपस्थितीचें प्रमाण आणि आजारपण आणि अपंगत्वाच्या भत्त्यांचा वाढलेला निर्देशांक हीं योजनेच्या कामगारप्रियतेचीं निश्चित गमकें आहेत. दिल्ली आणि कानपूर या ठिकाणच्या दवाखान्यांत २४ फेब्रुवारी १९५२ ते ३० जून १९५३ या मुदतींत ९,४१,३३२ जुने रोगी व २,५६,७३२ नवे रोगी यांचेवर उपचार करण्यांत आले. १९६५ व्यक्तींना अधिक उपचारांसाठीं इस्पितळांत पाठविण्यांत आलें. व १२,९४८ रोग्यांना त्यांच्या घरीं जाऊन तपासण्यांत आले. याच काळावधींत अपंगत्वाच्या भत्त्याच्या मागण्यांची संख्या ४,४३९ होती. कॉर्पोरेशनच्या शहरांतील मुख्य व उपकचेर्‍यांत भत्त्याची रोख रक्कम देण्यांत येते. अशा कचेर्‍या कानपुरांत ११, दिल्लींत ४ आणि पंजाबांत ८ आहेत.

### वैद्यकीय संघटना

वैद्यकीय उपचारांच्या सोयींचे बाबतींत राज्य सरकारांनीं व्यवस्था केल्या आहेत. या योजनेंतील यंत्रणेंत अनेक डॉक्टरांची नेमणूक केलेली आहे. दिल्ली आणि कानपूर येथें कामगारांच्या वैद्यकीय गरजा पुर्‍या करण्यासाठी अनुक्रमें ४१ व १६ संपूर्ण वेळ काम करणारे डॉक्टर नेमलेले आहेत. कानपुरांत २ फिरते दवाखाने धरून रात्रंदिवस उघडे असलेले १५ दवाखाने असून दिल्ली येथें एक फिरता दवाखाना धरून एकूण रात्रंदिवस उघडे असलेले ८ दवाखाने आहेत. याशिवाय दिल्लींत ८ कांहीं वेळ चालणारे दवाखाने असून एक पॅनल डॉक्टर आहेत. पंजाबांत ४७८ मालकांच्या सुमारें ३५,००० विमा योग्य कामगारांसाठीं यादींत ५८ डॉक्टरांचीं नांवें आहेत.

### भावी योजना

सदरहू योजना भारतांतील अनेक प्रदेशांत लागू करण्यांत येणार असून, मुंबई, प. बंगाल, मद्रास, म्हैसूर आणि मध्यप्रदेश या राज्यांत ती कार्यान्वित करण्यासाठा तयारी चालू आहे. या वर्षांत प. बंगालमधील हौरा जिल्हा व कलकत्ता शहरांत ती सुरू करण्याचें ठरलें आहे. मद्रास सरकारनें यासाठीं कोईमतूरची निवड केली असून म्हैसूर सरकार बंगलूरमध्यें वैद्यकीय उपचाराच्या व्यवस्थेबाबतच्या आपल्या सूचना तयार करीत आहे. दिल्ली, कानपूर आणि पंजाबमध्यें चाललेल्या या योजनेच्या कामाची पाहणी करून, नागपूरमध्यें तिची अंमलबजावणी करण्याबाबत अहवाल सादर करण्यासाठी मध्यप्रदेश सरकारनें एका ॲडमिनिस्ट्रेटिव्ह मेडिकल ऑफिसरची नेमणूक केली आहे. ही योजना ५,००० अगर त्याहून जास्त कामगार असलेल्या सर्व औद्योगिक ठिकाणीं १९५४ सालांत अमलांत आणण्यांत येईल अशी आशा वाटते.

ही योजना अजूनहि प्रयोगावस्थेंत आहे. अनुभव मिळत जाईल तसतशी तींत सुधारणा करून विमेदार कामगारांच्या कुटुंबांनाहि लागू करण्यांत येईल. इतकेंच नव्हे, तर इतर वर्गांतील कामगारांसहि ती लागू केली जाईल. आरोग्य विमायोजनेमुळें कामगारांत सुरक्षिततेची भावना निर्माण होते. त्यांस आशेचा किरण दिसतो. कल्याणकारी राज्य निर्मितीच्या मार्गावर सरकारचें एक पाऊल पुढें पडतें व मालकांना कार्यक्षमता व उत्पादन वाढविणारे निरोगी कामगार मिळतात. कॉर्पोरेशनच्या या तिन्हीं घटकांनीं योजनेची वाढ करण्याची तीव्र इच्छा दाखविली आहे व त्यामुळें अखेरीस आरोग्य विमा हे राज्यकारभाराचें नेहमींचेंच एक अंग होईल व देशांतील जीवनांतील सर्व क्षेत्रें व्यापणारी अशी प्रचंड यंत्रणा उभारली जाईल.

---

### पंजाबमधील हातमागाचा व्यवसाय बसला

भारतांत सर्वच राज्यांतील हातमागाचा धंदा अडचणींत सांपडलेला आहे. पंजाबमधील हातमागाचा धंदाहि अर्थातच याला अपवाद नाहीं. पंजाबमधील हातमागाच्या धंद्यावर आर्थिक अरिष्ट कोसळल्यामुळें लुधिआना येथील २०,००० मजूर रोजगारीला मुकले असून ३,२०० हातमाग बंद पडले आहेत. लुधिआना येथील हॅंडलूम इंडस्ट्री बोर्डानें ह्या बाबतींत जोराची चळवळ करण्याचें ठरविलें असून आपल्या कांहीं मागण्या पंजाब सरकारकडे सादर केल्या आहेत. सरकारनें या धंद्याकडे दुर्लक्ष केल्यामुळेंच तो संकटांत सांपडला, असें बोर्डातर्फे सांगण्यांत येत आहे. बोर्डानें सरकारकडे पुढील मागण्या केल्या आहेत. (१) कांहीं प्रकारचें कापड काढण्याची परवानगी फक्त हातमागवाल्यांनाच देण्यांत यावी, (२) हातमागवाल्यांना जें सूत पुरविण्यांत येतें त्याबद्दलचे वायद्याचे व्यवहार करण्यास बंदी करण्यांत यावी, (३) कच्चें सूत आणि हातमागाचा माल ह्यांच्यावर विक्री-कर वसूल करण्यांत येऊं नये, आणि (४) ऑल-इंडिया हॅंडलूम बोर्डावर लुधिआना येथील संघटनेला प्रतिनिधित्व देण्यांत यावें. संघटनेचे अध्यक्ष मि. सूद ह्यांनीं अशी माहिती दिली आहे कीं फाळणीपूर्वी लुधिआना येथें ७,००० हातमाग चालत असत. परंतु नंतर कांहीं हातमागवाले पाकिस्तानांत गेल्यामुळें हातमागांची संख्या ३,३०० झाली. आतां ह्यापैकी फक्त १०० हातमागच चालू आहेत. सध्याच्या आर्थिक संकटामुळें ५,२०० हातमागवाल्यांना स्वस्थ बसण्याची पाळी आली आहे. हातमागवाल्यांना मदत करून जगविण्यासाठी आणि धंदा पुन्हा नीट चालू करण्यासाठी राज्यसरकारनें दीर्घ मुदतीचें कर्ज देण्याची तरतूद करावी अशी मागणीहि त्यांना केली आहे.

### विजेच्या दिव्यांच्या कारखान्यांची स्थिति

भारतामध्यें स्वातंत्र्योत्तर कालांत विजेच्या निर्मितीसाठीं बऱ्याच धरण-योजना आखल्या गेल्या. परंतु त्या व्हाव्या तितक्या झपाट्यानें पूर्ण होत नसल्यामुळें विजेचे दिवे तयार करणाऱ्या कारखान्यांचें भवितव्यहि फारसें उज्ज्वल दिसत नाहीं. १९५० सालअखेर ह्या योजना पूर्ण होतील असें धरून चालून कारखानदारांनीं आपल्या कारखान्यांची उत्पादनशक्ति वाढविली. त्यासाठीं त्यांना ७५ लाखांपासून १ कोटी रुपयेपर्यंत नवीन भांडवल घालावें लागलें. पण योजना अपुऱ्या राहिल्यामुळें विजेच्या दिव्यांची मागणी अपेक्षेप्रमाणें वाढली नाहीं.

भारतीय सरकारनें ह्या धंद्याची जी पहाणी केली आहे तीवरून असें दिसून येतें कीं, भारतीय कारखाने दरवर्षी ३·२५ कोटी विजेचे दिवे तयार करूं शकतील. सध्या मात्र १·८ कोटी दिव्यांनाच दरवर्षी मागणी येते. अमेरिकेंत दरवर्षी २० कोटी नवे दिवे खपतात, ब्रिटनमध्यें १५ कोटी खपतात आणि जपानमध्यें १० कोटी खपतात. युद्धोत्तर कालांत दिव्यांच्या किंमती फारशा वाढल्या नसतांनाहि मागणी वाढलेली नाहीं. भरमसाठ उत्पादन करण्यांत येऊं नये म्हणून कारखानदारांनीं आतां स्वतःच उत्पादनावर निर्बंध घालून घेतले आहेत. फक्त २·२ कोटी दिवे दरवर्षी तयार करण्याचें त्यांनीं ठरविलें आहे. पण हेंहि उत्पादन गरजेपेक्षां अधिक असल्यानें कारखानदारांची आपसांत तीव्र स्पर्धा सुरू झाली आहे आणि त्यांचें भांडवल अडकून पडलें आहे. ह्या धंद्याच्या एकूण उत्पादनक्षमतेपैकी फक्त २५ टक्केच वापरण्यांत यावी असा निर्बंध भारतीय सरकारनें १९५३ साळापुरता घातला आहे. छोट्या कारखान्यांच्या सोईसाठी असें करण्यांत आल्याचें समजतें. देशांतील गरजा लक्षांत घेऊन मामुली मागणीशीं पुरवठा अधिक जुळता होईपर्यंत सरकारनें धंद्यावरील बंधनें चालू ठेवावीं अशी विनंति इंडिअन इलेक्ट्रिक लँप मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशननें केली आहे. सध्या धंद्याची उत्पादनक्षमता आणि लोकांची मागणी ह्यांच्यांत तफावत असली तरी मागणी वाढविण्याचे प्रयत्न कारखानदार करीत आहेत. विजेचे दिवे वापरण्याबद्दलचा प्रचार लोकांमध्यें करण्यांत येत आहे. त्याचप्रमाणें, पाण्यावरील अगर तेलावरील वीज-निर्मितीचीं केंद्रें ज्या ज्या ठिकाणीं आहेत त्यांच्या आसपासच्या खेड्यांत वीज खेळविण्यासाठीं सरकारनें योजना कराव्या अशी विनंति करण्यांत येत आहे. खेडोंपाडीं वीज मिळणें शक्य झाल्यावर दिव्यांची मागणी वाढून कारखानदारांला बरे दिवस अर्थातच येतील.

---

### भारताचा ब्रिटनशीं व्यापार: निर्गतीपेक्षा आयात जास्त

१९५३ च्या पहिल्या सहामाहींत भारतानें ग्रेट ब्रिटनकडे ६८·१० कोटी रु. च्या मालाची निर्गत केली व ब्रिटनकडून ७३·४५ कोटी रु. च्या मालाची आयात केली. म्हणजे, ग्रेट ब्रिटनशीं झालेल्या व्यापारांत ५·३५ कोटींची तूट आली.

१९५२ च्या पहिल्या सहामाहींत परिस्थिति उलट होती. भारताची निर्गत १५२·७३ कोटी रु. व आयात १४९·५३ कोटी रु. होऊन, ग्रेट ब्रिटनला ३·२० कोटींची तूट आली होती.

भारताच्या निर्गत मालांत मुख्य भरणा चहाचा होता. परंतु १९५२ च्या पहिल्या सहामाहींत १४३ कोटी पौंड चहा घेणाऱ्या ग्रेट ब्रिटननें १९५३ च्या पहिल्या सहामाहींत फक्त १२३ कोटी पौंड चहा घेतला.

### दि पूना मर्चंट्स् को. बँक लि.

वरील बँकेस अहवालाचे वर्षी ६,०६० रु. नफा झाला. सभासद संख्या ७९७, वसूल भांडवल १,१२,७२० रु., रिझर्व्ह फंड ४३,१८१ रु., इतर फंड ४८,०४२ रु., ठेवी ६,३९,६३६ रु., कर्जें ३,६४,३५१ रु. असे हिशेबपत्रकांतील प्रमुख आकडे आहेत. भागीदारांना ३% डिव्हिडंड मिळेल. (चेअरमन: ग. म. नलावडे. एजंट: भ. ग. सावणे. वार्षिक सभा: ३०-८-५३)

---

### इंपीरिअल बँकेचा पहिल्या सहामाहीचा अहवाल

| | १९५३ रु. | १९५२ रु. |
|---|---|---|
| एकूण उत्पन्न | ३·६३ कोटी | ३·९२ कोटी |
| त्यापैकीं व्याजाचें व डिस्कौंटचें उत्पन्न | २·६७ कोटी | २·७१ कोटी |
| „ कमिशनचें व ब्रोकरेजचें उत्पन्न | ९४·५८ लक्ष | १·१९ कोटी |
| दिलेलीं कर्जें | १·२४ कोटी | १४५·२६ कोटी |
| ठेवी | २०८·७५ कोटी | २२६·७८ कोटी |
| कॅश, कॉलमनी, इ. | २१·४९ कोटी | २७·८२ कोटी |
| कॅशचें ठेवींशीं प्रमाण | १०% | १२% |
| इनव्हेस्टमेंटस् | ८५·४५ कोटी | ८६·९६ कोटी |
| दिलेलें व्याज | ७०·६१ लक्ष | ९५·१८ लक्ष |
| नफा | ६३·१ लक्ष | ७०·१ लक्ष |

---

## दि अॅग्रिकल्चरल् प्रोड्यूस मार्केट कमिटी, सांगली

### ऑफिस इमारतीचा कोनशिला समारंभ

सांगली-मिरज रस्त्यावरील मार्केट यार्डचे नवीन जागेवर मार्केट कमिटीच्या ऑफिसचे इमारतीचा कोनशिला बसविणेचा समारंभ श्री. पां. ज. चिन्मुळगुंद, आय्. सी. एस्., रजिस्ट्रार, को-ऑपरेटिव्ह सोसायटीज व डायरेक्टर, अॅग्रिकल्चरल मार्केटिंग व रूरल फायनान्स, मुंबई राज्य, पुणें, यांचे हस्तें शुक्रवार ता. २१ ऑगस्ट १९५३ रोजीं सकाळीं १०-१५ वाजतां होणार आहे.

---

## मुंबई प्रां. सहकारी इन्स्टिट्यूट

### जून १९५३ मध्यें झालेल्या को. डिप्लोमा परीक्षेचा निकाल

### मुंबई व पुणें केंद्र

मुंबई

दुसरा वर्ग-नंबर्सः-२, ३, ७, ८, ९, १०, २०, २९, ३२, ३६, ३८, ४२, ५१.

पास वर्ग-नंबर्सः-११, १४, १९, ३०, ३४, ४१, ४४, ४७, ४९.

पुणें

पहिला वर्ग-नंबर्सः-३१.

दुसरा वर्ग-नंबर्सः-१, २, ४, ५, ७, ९, १०, १२, १३, १९, २०, २१, २३, २५, २७, २८, २९, ३३, ३४, ३७, ३८, ४०, ४२.

पास वर्ग-नंबर्सः-३, ११, १४, १५, १७, १८, २२, २४, ३०, ३२, ३९, ४५.

## मोटारी तयार करण्याच्या धंद्याबद्दल उद्‌बोधक चर्चा

(मा. म. काळे)

रोड ट्रॅन्सपोर्ट इन्स्टिटयूटच्या वतीनें मुंबई येथें इलेक्ट्रिक हाऊसमध्यें ता. १० जुलै रोजीं टॅरिफ कमिशननें मोटारींच्या धंद्याबद्दल जाहीर केलेल्या संरक्षणाच्या धोरणावर उद्‌बोधक चर्चा झाली. या चर्चेत धंद्याशीं घनिष्ठ संबंध असलेल्या लोकांनीं भाग घेतला होता. प्रीमिअर ऑटोमोबाइल्सचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. लालचंद हिराचंद म्हणाले कीं, सरकारनें टॅरिफ कमिशनच्या शिफारसी स्वीकारल्यामुळें देशांत मोटारी तयार करण्याचा धंदा स्थापन होईल. कमिशननें केलेल्या शिफारसींमुळें कारखानदारांचें काम कांहीं बाबतींत सोपें पण कांहीं बाबतींत कठीण होणार आहे. केवळ मोटारींचे सुटे भाग आयात करून त्यांची जुळवा-जुळव करणाऱ्या कारखानदारांना बंदी करण्यांत येईल हें चांगलें आहे. हें धोरण पूर्णपणें तीन वर्षांनंतर अमलांत यावयाचें आहे. श्री. लालचंद हिराचंद यांच्या मतें तें शक्य तितक्या अल्पावधींत अमलांत येणें चांगलें. मोटारींच्या बाबतींत आयातीवरील कर बऱ्याच प्रमाणांत कमी करण्यांत आला आहे. याचा धंद्यावर वाईट परिणाम होणें संभवनीय आहे, कारण या धंद्याची एकंदर परिस्थिति, मोटार-वाहातुकीच्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण, लोकांची घटत जाणारी क्रयशक्ति, भांडवल-संचयाबद्दल असमाधानकारक परिस्थिति, करांचें दडपण, इत्यादि गोष्टींवर अवलंबून आहे. फोर्ड मोटार कंपनीचे श्री. विथेल म्हणाले कीं, या नवीन धोरणामुळें लोकांना पाहिजे असलेल्या मोटारी बाजारांत मिळूं शकणार नाहींत. किंमतींतहि वाढ होईल व त्यामुळें मोटारी वापरणारांची संख्या आणखी कमी होईल. अंदाजा प्रमाणें मोटारी बांधल्या जातील याबद्दल खात्री कांहींच नाहीं, असें श्री. विथेल यांचें मत आहे. कमिशनच्या सर्व शिफारसी त्यांना पूर्णपणें मान्य नाहींत. तरी फोर्ड कंपनी सरकारी धोरणा-प्रमाणें आपला व्यवहार करील. जनरल मोटार्सचे श्री. लिंटन म्हणाले कीं, रस्त्यावरील वाहतुकीच्या प्रश्नाला प्रथम प्राधान्य दिलें पाहिजे व त्याचा एक भाग म्हणून मोटारी तयार करण्याच्या धंद्याचा विचार केला पाहिजे. ते असेंहि म्हणाले कीं, रस्त्यावरील वाहातुक पूर्णपणें वाढूं शकली म्हणजे मोटारी तयार करण्याचा प्रश्न आजच्या स्वरूपांत उद्‌भवणार नाहीं. सरकारच्या धोरणाबद्दल सामान्य नागरिक या दृष्टीनें श्री. एम्. ए. मास्टर यांनीं समाधान व्यक्त केलें, व संरक्षण आणि नागरी जीवन या दृष्टीनें या महत्त्वाच्या धंद्याची वाढ करण्याचें धोरण स्वीकारल्याबद्दल सर-कारला धन्यवाद दिले जर मोटारी तयार करण्याच्या खर्चांत वाढ झाली तर सरकारनें उत्पादनाचा खर्च व मोटारींची वाजवी किंमत यांमधला फरक स्वतः सोसावा. अशा प्रकारचें धोरण जहाजें बांधण्याच्या धंद्याबद्दल सरकारनें स्वीकारलेंच आहे असेंहि ते म्हणाले. डॉ. पाणंदीकर यांनीं देशी धंद्याला उत्तेजन देण्या-साठीं जनतेनें स्वदेशीचें धोरण स्वीकारावें असें मत व्यक्त केलें चर्चेचे अध्यक्ष, श्री. प्राणलाल देवकरण नानजी, यांच्या मतें मोटारी बांधण्याच्या धंद्याचें भवितव्य उज्ज्वल आहे व यासाठीं निश्चित केलेलें धोरण अमलांत आणलें पाहिजे.

---

झेकोस्लोव्हाकिआचें व्यापारी मंडळ— भारत आणि झेकोस्लोव्हाकिआ ह्यांच्यांत व्यापारी वाटाघाटी गेले कांहीं दिवस चालू होत्या. त्या पुढें चालू ठेवण्यासाठीं झेकोस्लोव्हाकिआचें व्यापारी-मंडळ नुकतेंच दिल्लीला आलें आहे.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) ||| श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४२,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |

एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. वा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जें देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखां-मध्यें होत असून त्याखेरिज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्ट्स् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर प. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.